Acknowledgement

# मनोगत

म. स. विद्यापीठ, बडोदे अंतर्गत मराठी विषयातील 'विद्यावाचस्पती' या पदवीसाठी प्रस्तुत शोधनिबंध सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. कोणतेही महत्त्वाचे कार्य पूर्ण होण्यास प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते हे खरे आहे. परंतु त्यासाठी अनेकांच्या सहकार्याची आणि प्रोत्साहनाची आवश्यकता असते हे ही तितकेच खरे आहे. यास्तव 'श्री सयाजी साहित्यामाला-एक चिकित्सक अभ्यास' हा प्रबंध पूर्ण होण्यास ज्या सहृदयांनी सहकार्य केले त्यांचा तसा नामनिर्देश करणे हे अगत्याचे आहे. त्यांच्या नावाचा नुसता उल्लेख केल्याने मी त्यांच्या ऋणातून मुक्त झाले असे होत नाही. परंतु त्यातल्या त्यात हाच एक मार्ग असल्याने मी त्यांचा तसा नामोल्लेख येथे करीत आहे. कारण हा प्रबंध पूर्ण झाल्यानंतर मी जेव्हा मागे वळून पाहिले तेव्हा या चाहत्यांच्या प्रेमळपणामुळेच आणि प्रोत्साहनामुळे हे कार्य शेवटास गेले या विचाराने माझे अंतःकरण भरून आले.

श्री सयाजीराव गायकवाड यांच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या उपक्रमांचे बहुजन समाजाच्या जागृतीसाठी साहाय्य झालेले आहे. या उपक्रमात ग्रंथनिर्मितीच्या उपक्रमांचे योगदान ही मोठे आहे, आणि या दृष्टीने श्री सयाजी साहित्यमालेचा अभ्यास महत्त्वाचा आहे. माझे एम.ए. पर्यंतचे सर्व शिक्षण बडोदे येथील म. स. विद्यापीठात झालेले आहे. प्रबंधविषयाचा मार्गदर्शकांसमोर विचार करताना त्यांच्या चर्चेतून अनेक गोष्टी आल्या. आपल्या भूसांस्कृतिक क्षेत्र परिसरातील अनेक अलक्षित असे विषय त्यामुळे लक्षात आले. आणि श्री सयाजी साहित्यमालेचा आपल्या क्षेत्रीय कक्षेतील अभ्यास त्या संदर्भात महत्त्वाचा ठरू शकेल हे लक्षात घेऊन हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला.

हे प्रबंधाचे कार्य मोठे जिकीरीचे, मेहनतीचे आणि अवघड असे होते. विभागातील सर्व शिक्षकांनी दिलेले संस्कार माझ्यावर होतेच, परंतु डॉ. सुषमा करोगल, मराठी विभाग प्रमुख, महाराजा सयाजीराव विद्यापीठ बडोदे, यांच्या मार्गदर्शनामुळे ते सोपे झाले. त्यांनी पीएच.डी. साठी मला मार्गदर्शन करण्याचे मान्य करून जे प्रोत्साहन दिले, या साठी त्यांची खरोखरच मी अत्यंत आभारी आहे. त्यांची मार्गदर्शन करण्याची पद्धत, सहकार्य करण्याची वृत्ती भारावून टाकणारी आहे. मी येथे फक्त एवढेच म्हणेन की त्यांच्या ऋणाची फेड होऊ शकेल असे वाटत नाही. याचबरोबर

प्राच्यविद्यामंदीर बडोदे येथील कार्यकारी नियामक डॉ. मुकुंद लालजी वाडेकर, उपनियाकम डॉ. सिद्धार्थ यशवंत वाकणकर तसेच श्री. जयंतभाई के. उमरेठीया यांचे सहकार्य मिळाले आहे. प्रबंध लेखनासाठी ज्यांनी मौलिक सहकार्य केले असे डॉ. गणेश देवी, डॉ. बंसीधर शर्मा, श्री. श्री. बा. जोशी, श्री चामुलाल राठवा, श्रीमती अरूणा जोशी या सर्वांची मी आभारी आहे. श्रीमती हंसा महेता लायब्ररीतील कर्मचाऱ्यांची सुद्धा मी आभारी आहे. बडोद्रे येथील दफ्तर कचेरी व अभिलेखागारातील सर्व पदाधिकाऱ्यांचेही आभार मानण्यात मला आनंद होत आहे.

या प्रबंधासाठी संशोधनाचे काम सुरू केले आणि त्या दरम्यानच माझा विवाह झाला. बडोदे ते चिपळूण हे भौगौलिक अंतर लांबच होते. विद्यार्थी दशा आणि गृहिणी या माझ्या दोन स्थानातही आता फरक पडला होता. माझे तीन चतुर्थांश काम विवाहापूर्वी पूर्ण झाले होते, परंतु बाकी राहिलेले काम मार्गदर्शकांना दाखविण्यासाठी सतत चिपळूण ते बडोदा ये जा केल्याने हे अंतर पूर्वीसारखे लांब वाटेनासे झाले. नोकरी, घरातली जबाबदारी सांभाळत संशोधनाचे हे काम पूर्ण करणे म्हणजे तारेवरची कसरत होती. परंतु नोकरीशी संबंधित सर्व पदाधिकारी आणि घरातील सर्व वडिलधारी माणसे, यांच्या वेळोवेळी मिळणाऱ्या उत्तेजनामुळे मी हे काम पूर्ण करू शकले. या सर्वात विशेष उल्लेख करावयाचा म्हणजे श्री शेखर निकम, श्री द. ना. शेंबेकर गुरुजी, श्री. टी. व्हाय. कांबळे सर, माझे सासरे श्री ज. का. शेंबेकर, सासूबाई सौ. वि. ज. शेंबेकर, माझी आई सौ. कुंदा कुलकर्णी, वडील श्री. दा. पां. कुलकर्णी या सर्वांचे मोलाचे प्रोत्साहन आणि सहकार्य मिळाले. माझे पती श्री. र. ज. शेंबेकर यांनी मला जी 'साथ' दिली ती अनमोल आहे. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे माझी मुलगी चि. ऋचा सव्वा वर्षांची असताना सुद्धा मी प्रबंधलेखनाचे माझे कार्य पूर्ण करू शकले.

माझ्या संशोधन लेखनाची अक्षरजुळवणी अतिशय उत्तम दर्जाने करुन देणारे श्री सुहास काळे यांच्या सहकार्याशिवाय आणि त्यांनी घेतलेल्या अपार कष्टाशिवाय, त्यांच्या उत्तम दर्जाच्या आग्रहाशिवाय हे काम समाधानकारक होणे अशक्य होते.

सर्वच कार्ये शेवटी ज्या परमेश्वराच्या प्रेरणेने निर्माण होतात आणि त्याच्याच कृपेने सिद्धीस जातात. त्याचे आशिर्वाद मला सदैव मिळोत आणि माझ्या हातून अल्पसे का होईना काम होवो ही त्याच्या चरणी प्रार्थना.

*- दीप्ति दामोदर कुलकर्णी*

## अर्पणपत्रिका

श्रीमंत महाराज

# सयाजीराव गायकवाड

**सेनाखासखेल, समशेरबहादुर**

**जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्. एल्. डी.**

यांस

त्यांच्या असीम साहित्यप्रेमाबद्दल

व

सर्वांगीण विद्वत्तेबद्दल

अत्यंत सादर अर्पण.

सकलगुणैश्वर्यमंडित, साहित्यप्रेमी, विद्याभिलाषी,

गुर्जराधिपति



श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल, समशेर बहादूर–राज्य बडोदें.